महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==================================================================

जावक क्रमांक – ३८०४/५१ दिनांक :- २५ सप्टेंबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

**म्हाडा मुंबई मंडळ सदनिका सोडत -२०२४**

# २०३० सदनिका विक्री सोडतीला उत्तुंग प्रतिसाद: १.३४ लाख अर्ज प्राप्त

## १.१३ लाख अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा करून सोडतीतील सहभाग केला निश्चित

मुंबई, २५ सप्टेंबर, २०२४ : – म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेल्या २०३० सदनिका विक्रीच्या संगणकीय सोडत प्रक्रियेला अर्जदारांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला असून १,३४,३५० अर्ज संगणकीय सोडत प्रणालीमध्ये प्राप्त झाले आहेत यापैकी १,१३,८११ अर्जदारांनी अद्यापपर्यंत अनामत रकमेचा भरणा करून सोडत प्रक्रियेतील सहभाग निश्चित केला आहे. मुंबई मंडळाच्या सोडतीस अर्जदारांनी दिलेला सामर्थ्यशील प्रतिसाद म्हणजे सर्वसामान्य नागरिकांचा म्हाडावरील विश्वासाचे प्रतीक दर्शवितो.

मुंबई मंडळातर्फे अर्ज भरणा करण्याची मुदत १९ सप्टेंबर रोजी रात्री ११.५९ वाजता संपुष्टात आली व अर्जदारांना अनामत रकमेचा ऑनलाइन भरणा करण्यासाठी देखील रात्री ११.५९ पर्यन्त मुदत देण्यात आली होती. दि. २७ सप्टेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता सोडतीसाठी प्राप्त अर्जांची प्रारूप यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर दि. २९ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यापासून ऑनलाईन दावे-हरकती अर्जदारांना दाखल करता येणार आहेत. दि. ३ ऑक्टोबर , २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची अंतिम यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी दि. ९ ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी ११.०० वाजेपासून ऑनलाइन अर्ज नोंदणी व स्वीकृती प्रक्रियेला सुरुवात झाली. मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णता ऑनलाइन अशा IHLMS २.० या संगणकीय प्रणालीद्वारे ही सोडत प्रक्रिया राबविण्यात आली आहे. या सोडतीचे विभाजन तीन गटांमध्ये करण्यात आले आहे. यामध्ये नव्याने बांधकाम चालू असलेल्या गटामध्ये १३२७ सदनिकांचा समावेश आहे तर दुसर्या गटामध्ये विकास नियंत्रण नियमयमावली ३३ (५ ) , (७),५८ अंतर्गत पुर्नविकास प्रकल्पातून म्हाडाला प्राप्त झालेल्या ३७० सदनिकांचा समावेश आहे. तसेच तिसर्याक गटांतर्गत मागील सोडतीतील विविध वसाहतीतील विखुरलेल्या ३३३ सदनिकांचा समावेश आहे. उत्पन्न गट निहाय या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटातील एकूण ३५९ सदनिकांकरीता ५०,९९३ अर्ज सादर झाले आहेत व त्यापैकी ४७,१३४ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. अल्प उत्पन्न गटातील एकूण ६२७ सदनिकांकरीता ६१,५७१ अर्ज प्राप्त झाले आहेत व त्यापैकी ४८,७६२ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे . मध्यम उत्पन्न गटातील एकूण ७६८ सदनिकांकरीता १४,२९३ अर्ज सादर झाले आहेत व त्यापैकी ११,४६१ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे . तसेच उच्च उत्पन्न गटातील एकूण २७६ सदनिकांकरीता ७४९३ अर्ज प्राप्त झाले आहेत व त्यापैकी ६४५४ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे .

सोडत प्रक्रियेमध्ये अर्जदारांचा लाभलेला प्रतिसाद पाहता विकास नियंत्रण नियमयमावली ३३ (५) अंतर्गत गटातील नेहरू नगर , कुर्ला या योजनेतील १४ सदनिकांकरीता एकूण ४०२६ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी ३१२४ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. तर ओशिवरा येथील योजनेतील एका सदनिकेकरीता एकूण ७६५ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी ५४६ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. तसेच सिद्धार्थ नगर , गोरेगाव

येथील २ सदनिकांकरीता एकूण ७४९ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी ६०२ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. तसेच कन्नमवार नगर , विक्रोळी (४९२ ) या योजनेतील २ सदनिकांकरीता एकूण ६२० अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी ४४६ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. तसेच विकास नियंत्रण निमयमावली ३३ (७) अंतर्गत भुलेश्वर विभाग वेलकर स्ट्रीट या योजनेअंतर्गत एका सदनिकेकरिता ५३३ अर्ज प्राप्त झाले असून यापैकी ४२२ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. तसेच मुंबई मंडळातर्फे नव्याने बांधकाम चालू असलेल्या गटामध्ये शिवधाम जुनी दिंडोशी, म्हाडा कॉलनी मालाड(४८६) या योजनेतील एका सदनिकेकरिता ४१९ अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी २९१ जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. तसेच शिवधाम कॉम्प्लेक्स जुनी दिंडोशी, म्हाडा कॉलनी मालाड(४७७) या योजनेतील ४५ सदनिकांकरीता ११,२८० अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी ९,५१९ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केला आहे. अर्जदारांच्या प्रतिसादाचा ओघ पाहता मुंबईतील परवडणार्याअ दारातील घरांची गरज अधोरेखित होते.

सदनिकांच्या वितरणाकरिता प्राप्त अर्जांची संगणकीय सोडत ८ ऑक्टोबर, २०२४ रोजी दक्षिण मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे काढण्यात येणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

Outward No. 3804/51 Dt. 25th September, 2024

Press Release

MHADA Mumbai Board Housing Lottery 2024

## Outstanding Response with Over 1.34 Lakh Applications for 2,030 Flats

### 1.13 Lakh Applicants Confirm Participation by Submitting EMD

Mumbai, September 25, 2024: The Mumbai Housing and Area Development Board (MHADA) has received an overwhelming response to its 2024 housing lottery for 2,030 tenements. A total of 1,34,350 applications have been received in the computerized system, with 1,13,811 applicants have secured their participation by paying the required Earnest Money Deposit (EMD). This exceptional public engagement reflects the strong trust placed in MHADA's efforts to provide affordable housing for Mumbai's citizens.

The application process concluded on September 19, 2024, at 11:59 PM, with the deadline for EMD payments being the same. The provisional list of eligible applicants will be published on MHADA's official website https://housing.mhada.gov.in at 6:00 PM on September 27, 2024. Applicants will have until 12:00 PM on September 29, 2024, to submit any claims or objections online. The final list of eligible applicants will be published on October 3, 2024, at 6:00 PM.

The registration and approval process for the lottery began on August 9, 2024, at 11:00 AM, using the most transparent and completely online housing lottery system - IHLMS 2.0 system. The 2030 tenements enlisted for the sale in the lottery are distributed as follows: 1,327 units in newly constructed projects, 370 units from redevelopment schemes under DCR 33 (5), (7), and 58, and 333 scattered units from previous lotteries.

The demand for these tenements has been significant across all income groups. For the Economically Weaker Section (EWS), 35,359 applications were received for 359 units, with 47,134 applicants confirming their participation by paying the EMD. In the Low-Income Group (LIG), 61,571 applications were submitted for 627 units, of which 48,762 have been

confirmed. In the Middle-Income Group (MIG), 14,293 applications were submitted for 768 units, with 11,461 applicants making the necessary EMD payments. In the High-Income Group (HIG), 7,493 applications were received for 276 units, with 6,454 applicants confirming their participation.

Certain housing projects have seen particularly high interest from applicants. In the redevelopment category under DCR 33 (5), the Nehru Nagar, Kurla project, offering 14 flats, received 4,026 applications, with 3,124 applicants confirming their participation by submitting the EMD. The Oshiwara project, with 1 flat, attracted 765 applications, and 546 applicants have completed the EMD process. At Siddharth Nagar, Goregaon, 2 flats drew 749 applications, with 602 applicants confirmed. The Kannamwar Nagar, Vikhroli project, offering 2 flats, received 620 applications, with 446 confirmed EMD submissions. For the Welkar Street, Bhuleshwar project under DCR 33 (7), 1 flat received 533 applications, with 422 applicants completing the payment.

In the newly constructed projects category, the Shivdham project in Malad (1 flat) received 419 applications, with 291 applicants confirming their participation. Meanwhile, the Shivdham Complex (45 flats) saw 11,280 applications, with 9,519 confirmed EMD submissions. The high level of interest highlights the persistent demand for affordable housing in Mumbai, reinforcing MHADA's important role in addressing this critical need. The final lottery draw for flat allocation will take place on October 8, 2024, at the Yashwantrao Chavan Centre in South Mumbai.

For further details and updates, please visit MHADA's official website.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer, MHADA

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial